## आदेश निशाणी क्र.१५ वर

१. प्रस्तुत अर्ज याचीकाकर्तीने हिंदु विवाह कायदयाचे कलम २४ अंतर्गत अंतरीम खावटी मिळण्यास सादर केला आहे. तिचे म्हणणे थोडक्यात असे की, तिने उत्तरवादी विरूध्द फारकत मिळण्याकरीता याचीका दाखल केली आहे. मुळ याचीका निकाली लागण्यास कालावधी लागु शकतो, अशा परिस्थीतीत तिला अंतरीम खावटी मंजुर होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु उत्तरवादीने ही जबाबदारी पुर्णपणे नाकारली आहे व तिच्या जिवनाची हेळसांड केली आहे व तिला तिच्या माहेरी राहणे भाग पाडले आहे. तिने डॉक्टरकीचे शिक्षण घेतले आहे परंतु तिला कोणतेही उत्पन्न होत नाही. उत्तरवादी हा व्यवसायाने डॉक्टर आहे व त्याचे अंबरनाथ येथे महालक्ष्मी नगरात दवाखाना आहे व त्याला दरमहा एक लाख रूपये उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे त्याच्या कुटूंबातील मौजे इजा वनश्री, जिल्हा वाशिम येथे शेतजमीन सुध्दा आहे व त्यापासुन त्याला चांगले उत्पन्न होते. तसेच उत्तरवादीचे उल्हासनगर येथे १५०० चौ.फुटाचे चांगले बांधलेले मोठे घर आहे. त्याचे वडील पेन्शनर असुन त्याची आर्थीक परिस्थीती अत्यंत सुदृढ आहे. तिला तिच्या उदरनिवार्हाकरीता व दैनंदिन जिवनावश्यक गरजा पुर्ण करण्याकरीता दरमहा रू.२५,०००/— अंतरिम खावटीची आवश्यकता आहे. तसेच कोर्ट खर्च व वकील फी करीता रू.२०,०००/— ची आवश्यकता आहे. शेवटी तिने विनंती केली की, तिचा अर्ज मंजुर होवुन तिला उत्तरवादीकडुन दरमहा रू.२५,०००/— अंतरिम खावटी व वकील फी करीता रू.२०,०००/— उत्तरवादीकडुन मंजुर करण्यात यावे.

२. उत्तरवादीने त्याचा लेखी जवाब निशाणी क्र.१६ प्रमाणे दाखल केला आहे. त्याने अर्जातील कथन नाकारले आहे. त्याचे म्हणणे असे की, याचीकाकर्ती ही उच्च शिक्षीत असुन तिच्याकडे आयुर्वेदाची पदवी आहे आणि या आधारावर तिने मंगरूळपीर येथे अशोक नगरमध्ये मातोश्री क्लिनीक या नावाने दवाखाना सुरू केला आहे व तिला स्वतंत्र उत्पन्नाचे साधन आहे. ती अंतरिम खावटी मागण्यास

पात्र नाही. त्याला महिन्याकाठी एक लाख रूपये उत्पन्न मिळत नाही, मौजे इंजा (वनश्री) येथे त्याची काहीही शेत जमीन नाही व उल्हासनगर येथे त्याच्या स्वत:च्या मालकीचे घर सुध्दा नाही. याचीकाकर्तीच्या त्रासामुळे तो फार खचुन गेलेला आहे व त्याचे गंभीर परिणाम त्याच्या व्यवसायावर झाला असुन उत्पन्नही कमी झाले आहे. त्याला स्वत:चा व दवाखानाच्या खर्च पाणी निघणे सुध्दा कठीण झाले आहे. त्याच्या म्हाताऱ्या आईवडीलांची जबाबदारी त्याच्यावर आहे. याचीकाकर्तीने त्यास त्रास देण्याच्या उद्येशाने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. शेवटी त्याने विनंती केली की, अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा.

३. याचीकाकर्ती तर्फे श्री राठी वकील आणि उत्तरवादीतर्फे श्री पि.व्ही. पाटील वकील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले.

४. याचीकाकर्ती व उत्तरवादी यांना लग्नाबद्यल तसेच याचीकाकर्ती माहेरी राहत असल्याबद्यल वाद नाही. हे तथ्य आहे की, याचीकाकर्तीने घटस्फोटाचा हुकूमनामा मिळण्यासाठी प्रस्तुत याचीका दाखल केली आहे. उत्तरवादीने कथन केले आहे की, याचीकाकर्ती वैद्यकीय व्यवसाय करते. याचीकाकर्तीने डॉक्टरकीचे शिक्षण घेतल्याचे मान्य केले आहे, परंतु तिला त्यापासुन कोणतेही उत्पन्न होत नाही असेही कथन केले आहे. उत्तरवादीने याचीकाकर्तीचे मंगरूळपीर येथे मातोश्री क्लिनीक सुरू असल्याबद्यल कोणताही प्राथमिक पुंरावा दाखल केला नाही. अभिलेखावर उपलब्ध मसुदयावरून याचीककर्तीकडे वैद्यकीय व्यवसायापासुन किंवा इतर साधनांपासुन उत्पन्न मिळत असल्याचे दिसुन येत नाही. अशापरिस्थीतीत तिला उदरनिर्वाहासाठी आणि प्रस्तुत प्रकरण चालविण्यासाठी आवश्यक आर्थीक सहाय्य नाही असे दिसुन येते. अशापरिस्थीतीत ती उत्तरवादीकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

५. उत्तरवादीकडे उल्हासनगर येथे मालकीचे मोठे घर असल्याबद्दल व मौजे इंजा येथे शेतजमीन असल्याबद्दल प्राथमिक पुरावे याचीकाकर्तीने दाखल

केले नाहीत. याचीकाकर्तीने दाखल केलेल्या सातबारा उता—यावरून उत्तरवादीच्या वडीलाकडे मौजे इंजा येथे शेतजमीन असल्याचे दिसुन येते. परंतु त्यापासुन उत्पन्न उत्तरवादीला मिळते, असे म्हणता येणार नाही. म्हणुन उत्तरवादीला शेतजमीनीपासुन उत्पन्न मिळत असल्याचे दिसुन येत नाही. उत्तरवादी हा वैद्यकीय व्यवसाय करतो हे त्याने मान्य केले. जरी त्याने वैद्यकीय व्यवसायापासुन दरमहा एक लाख रूपये उत्पन्न मिळत असल्याचे नाकारले असले तरी हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की, तो अंबरनाथ जिल्हा ठाणे या मोठया ठिकाणी वैद्यकीय व्यवसाय करतो. म्हणुन त्यास वैद्यकीय व्यवसायापासुन दरमहा एक लाख रूपये मिळणे शक्य आहे. यावरून उत्तरवादीकडे पर्याप्त उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसुन येते. याचीकाकर्ती तिचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्यामुळे व उत्तरवादीकडे पर्याप्त उत्पन्नाचे साधन असल्यामुळे याचीकाकर्ती उत्तरवादीकडुन हिंदु विवाह कायदयाच्या कलम २४ अंतर्गत अंतरिम खावटी व प्रस्तुत प्रकरण चालविण्याकरीता खर्च मिळण्यास पात्र आहे.

६. उत्तरवादीचे उत्पन्न व सध्याची परिस्थीतीत जिवनावश्यक वस्तुंचे मुल्यांचा विचार करता दरमहा रू.४,०००/— उत्तरवादीला अंतरिम खावटी तसेच न्यायालयीन खर्चासाठी रू.१०,०००/— मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. उत्तरवादीने दरमहा रू.४,०००/— प्रमाणे अंतरीम खावटी याचीकाकर्तीला या आदेशाच्या तारखेपासुन या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत दयावे.

३. उत्तरवादीने न्यायालयीन खर्च म्हणुन रू.१०,०००/— याचीकाकर्तीला दयावे.

स्वा/—

(एस. ए. बजाज)
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर,
जोड न्यायालय, मंगरूळपीर

दि.०२.०३.२०१९

ERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/ Order are same word to word, as per the original Order.

1) Name of the Stenographer :- N. B. Khandare, Steno (Grade-II)
2) Court Name :- C.J.S.D., Link Court, Mangrulpir
3) Date :- 02/03/2019
4) Order signed by the Presiding Officer on :- 02/03/2019
5) Order uploaded on :- 02/03/2019